# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.05.2024** **वारःशुक्रवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीचा प्रचार संपला; ५७ मतदारसंघांमध्ये उद्या होणार मतदान

2.नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार

3.२०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर सात टक्के राहण्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आणि

4.मान्सून केरळमध्ये दाखल

**प्रचार सांगता**

टप्प्यातला प्रचार काल संध्याकाळी संपला. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघामध्ये उद्या मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होणार आहे. विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची तसंच पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजीच होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी मात्र २ जून रोजी होणार आहे.

आचार संहिता

राज्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची सर्व टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असली; तरी आदर्श आचारसंहिता अद्यापपर्यंत सुरू आहे; त्यात कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्यात आलेली नाही, असं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचं या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**मतमोजणी**

सांगली लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या 4 जून रोजी मीरजमध्ये वखार महामंडळ इथं होणार आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी काल मतमोजणी केंद्राची पाहणी केली. मतमोजणीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कामं तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**रिझर्व्ह बँक**

२०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर सात टक्के राहील, असा अंदाज भारतीय रिझर्व्ह बँकेनं वर्तवला आहे. रिझर्व्ह बँकेनं काल सध्याच्या आर्थिक वर्षाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतील मध्यवर्ती बँकेच्या कामकाजाचा समावेश करण्यात आला आहे. एक एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था गतिमान आणि अधिक मजबूत झाल्याचं रिझर्व्ह बँकेच्या या ताज्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. यामुळे सकल

देशांतर्गत उत्पादनातही वाढ झाली असून तो ७ पूर्णांक ६ दशांश टक्के झाला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात हा दर ७ टक्के होता. सलग तीन वर्षे हा दर सात टक्के किंवा त्याहून अधिक राहिला असल्याचंही यामध्ये नमूद करण्यात आलं आहे.

**अग्निबाण**

आयआयटी मद्रासच्या अग्निकुल कॉसमॉस या स्टार्टअपनं तयार केलेल्या 'अग्निबाण' या रॉकेटचं काल श्रीहरीकोटा इथल्या हवाई तळावरून यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. संपूर्ण स्वदेशी बनावटीचं त्रिमितीय अर्थात थ्री डायमेंशनल प्रिंटेड इंजिन असलेलं जगातील अशा प्रकारचं हे पहिलंच रॉकेट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उल्लेखनीय कामगिरीचं कौतुक करुन त्यातील सहभागी सदस्यांना भावी यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**अहिल्याबाई होळकर**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची आज जयंती आहे. यानिमित्त राज्यात सर्वत्र आज अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अहमदनगर जिल्ह्यात आज यानिमित्तानं होणाऱ्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये या निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. काल पारंपरिक गजीनृत्याचं; तसंच 'मी अहिल्या बोलतेय' या नाट्यप्रयोगाचं सादरीकरण झालं.

**इंट्रो**

**ईऑफिस**

धाराशिव जिल्हा परिषदेचे कामकाज ई-ऑफिस प्रणालीद्वारे सुरू झालं असून कागदविरहित कामकाज करणारी धाराशिव ही मराठवाडा विभागातील पहिली जिल्हा परिषद ठरली आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून..........

**स्क्रिप्ट**

**धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष यांच्या संकल्पनेतून ई-ऑफिस प्रणालीद्वारे जिल्हा परिषदेच कामकाज सुरू होण्यास प्रारंभ झाला आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणं पूर्ण झाली असून स्वतंत्र ई-मेल आयडी कार्यान्वित होवून सुरू झालं पेपरलेस कामकाज. यामुळे फाइल्स प्रलंबित राहण्याचं प्रमाण शून्यावर येणार असून, चालू तारखेतच काम होणार असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामात गतिमानता येणार आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदांचा अपव्यय कमी होऊन अभिलेखे वर्गीकरण आणि जतन करण्याचा भार देखील कमी होणार आहे. या ई-ऑफिस प्रणाली कामकाजामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची काम जलदरीत्या पूर्ण होऊन गतिमान प्रशासनाचा सुखद अनुभव जिल्हावासीयांना मिळणार आहे.**

**-देविदास पाठक आकाशवाणी वार्ताहर धाराशिव.**

**राज्यपाल**

एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त आणि समाजसेवेचे संस्कार घडतात; त्यामुळे एनसीसी प्रशिक्षण सर्वांना अनिवार्य झाले तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल, असं मत राज्यपाल रमेश बैस यांनी काल मुंबईत व्यक्त केलं. राष्ट्रीय छात्र सेनेचं महाराष्ट्र संचालनालय सर्वोत्कृष्ट संचालनालय ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते काल 'राज्यपालांचं प्रशस्तीपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंदर सिंह यांना हे प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आलं.

**<u>कृषी महाविद्यालय</u>**

पुण्यातील कृषि महाविद्यालयात साहिवाल गाईंच्या संवर्धनाच्या दृष्टीनं संशोधनासाठी माहिती संकलन केंद्र मंजूर झालं आहे. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी काल ही माहिती दिली. साहिवाल गाईंच्या अनुवंशिक क्षमतेचं संवर्धन, प्रसार आणि अनुवंशिक सुधारणा करणं हा या केंद्राचा प्रमुख उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>करसवलत</u>**

पुणे महापालिकेनं २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा मिळकत कर ५ ते १० टक्के सवलतीने भरण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही १ एप्रिल ते ३१ मे अशी दोन महिन्यांची मुदत दिली होती. मात्र पुण्यातील मिळकतधारकांना महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणीमुळे कर भरता येत नसल्याचं दिसून आलं; त्यामुळे सवलतीने कर भरणाऱ्यांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे, असं आयुक्त डॉ. राजेद्र भोसले यांनी सांगितलं.

**<u>पालखी नियोजन</u>**

आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी प्राधान्य द्यावं आणि सर्व यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल दिल्या. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी काल अधिकारी वर्गासह पालखी तळांची आणि पालखी मार्गाची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले.

**<u>हिवरे बाजार</u>**

अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजारमधील लोकसहभागाचं मॉडेल बेल्जियममध्ये राबवणार असून, जागतिक तापमान बदलाचं उत्तर लोकसहभागातूनच देणं शक्य आहे, असं मत बेल्जीअममधील गेमबलॉस विद्यापीठाच्या ग्रामविकास विभागातील तज्ज्ञ डॉक्टर नाश्तासिहा गुमोचडिया यांनी व्यक्त केलं आहे. हिवरे बाजार गावाला त्यांनी नुकतीच भेट दिली, पोपटराव पवार यांनी त्यांना विकास कामांची माहिती दिली.

**<u>बिबट्या</u>**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात असलेल्या माणिकडोह इथल्या एकमेव बिबट्या निवारा केंद्राची क्षमता वाढवण्याच्या कामाला राज्य शासनानं मान्यता दिली आहे. गेल्या ६ महिन्यात या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्यात किमान ५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

**<u>बिबटे</u>**

दरम्यान भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील चिखला आणि तालुक्यातील इतर गावांमध्ये बिबट्याचा मुक्त संचार सुरू आहे; त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. या बिबट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**कारवाई**

नंदुरबार जिल्हा परिषदेमधील कथीत अपंग विभाग गैरव्यवहार प्रकरणी 72 जणांवर कारवाई करत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार यांनी त्यांच्या सेवा समाप्तीचे आदेश दिले आहेत.

2017मध्ये जिल्हा परिषदेमध्ये नियमबाह्य पद्धतीने या विभागासाठी भरती करण्यात आली होती. 2018मध्ये ते उघड झाल्यानंतर अधिवेशनात या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली होती.

**टँकर**

पुणे महसूल विभागातील पाचही जिल्ह्यात सध्या ८०८ टँकरद्वारे सुमारे १४ लाख लोकांना पाण्याचा पुरवठा केला जात आहे. त्यातील सर्वाधिक म्हणजे २९२ टँकर पुणे जिल्ह्यात सुरु असून जिल्ह्यातील १९१ गावं आणि १ हजार ४०८ वाड्या वस्त्यांमधील सुमारे ४ लाख २० हजार नागरिकांना आणि अडीच लाखाहून अधिक पशुधनाला टँकरमधून पाणी पुरवठा सुरु आहे. पुण्यापाठोपाठ सातारा जिल्ह्यात २०४ तर सोलापूर जिल्ह्यात २०३ टँकर सुरु आहेत.

**पाऊस**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस काल केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेच्या दोन दिवस अगोदरच दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तमिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

**हवामान**

येत्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून राज्याच्या उर्वरीत भागात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.